# भंडारा पोलीसांकडुन वाघांचा कुख्यात आंतरराष्ट्रीय शिकारी कट्टु पारधी यास अटक भंडारा पोलीसांची प्रशंसनिय कामगीरी



कुख्यात बहेलीया समाजाचा वाघांची शिकार करण्यात तज्ञ असलेला आरोपी नामे राहुल ऊर्फ कट्टु गुलाबसिंग गोंड ठाकुर ऊर्फ पारधी वय ३० वर्ष रा. बकडया ता. धनेरा जिल्हा खंडवा (म.प्र.) हा भंडारा जिल्हा कारागृहात वन्य अधिनियमांतर्गत नोंद असलेल्या गुन्हयांमधे न्यायाधीन बंदी म्हणुन होता त्यास दिनांक २१/०१/२०१६ रोजी भंडारा कारागृहातुन वडसा येथील न्यायालयात पेश करण्याकरीता पोलीस मुख्यालय भंडारा येथुन पोलीस गार्ड नेमण्यात आली होती. पोलीस गार्डने आरोपी राहुल ऊर्फ कट्टु यास वडसा न्यायालयात पेश केल्यानंतर त्यास भंडारा जिल्हा कारागृहात दाखल करण्याकरीता एस. टी. बसने घेवुन येत असतांना वडसा साकोली मार्गावरील मौजा दिघोरी गांवासमोर अंदाजे १ कि. मी. अंतरावर सायंकाळी अंदाजे ०६:१५ वा. दरम्यान आरोपीने लघवी लागल्याचे सांगीतल्याने पोलीस गार्ड त्यास घेवुन बस खाली उतरले असतांना आरोपीने पोलीस गार्डला धक्का देवुन पोलीसांचे कायदेशीर रखवालीतुन हातकडी व दोरासह पळुन गेला.यावरुन आरोपी राहुल ऊर्फ कट्टु याचे विरुध्द पोलीस स्टेशन दिघोरी येथे अप. क्र. ३००१/२०१६ कलम २२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पळुन गेलेला आरोपी राहुल ऊर्फ कट्टु हा कुख्यात बहेलीया समाजाचा आहे व वाघांची शिकार करण्यात तो तज्ञ असुन त्याचे विरुध्द भंडारा व गडचिरोली जिल्हयात वाघांच्या शिकार प्रकरणी वन्यजिव अधिनियमान्वये अनेक गुन्हे नोंद असुन त्यास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचे पथकाकडुन अटक करण्यात आले होते अशी माहीती मिळाल्याने प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे हस्तांतरीत केला.

फरार आरोपी राहुल ऊर्फ कट्टु पारधी याचे सद्याचे वास्तव्याची माहीती गोपनिय यंत्रणा व ईलेक्ट्रॉनिक माध्यमातुन घेणे सुरु असतांना पोलीस अधीक्षक विनीता साहू यांना अत्यंत गोपनिय माहीती मिळाल्यावरुन आरोपी राहुल ऊर्फ कट्टु पारधी हा उत्तर प्रदेशातील लखीमपुर खिरी येथे वाघाची शिकार व चंदन चोरीच्या प्रयत्नात वास्तव्यास असल्याची माहीती मिळाल्यावरुन पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी पोलीस अधीक्षक लखीमपुर खिरी आणि वरीष्ठ पोलीस अधीक्षक स्पेशल टास्क फोर्स लखनऊ ( उ. प्र. ) यांचेशी व्यक्तीशः संपर्क करुन त्यांना उपरोक्त फरार आरोपीचे कृत्य व त्याचे वर्णनाची इत्यभुत माहीती दिल्यावरुन श्री. मनोज झा, पोलीस अधीक्षक लखीमपुर व श्री. अरविंद चतुर्वेदी अपर पोलीस अधीक्षक लखीमपुर खिरी आणि वरीष्ठ पोलीस अधीक्षक स्पेशल टास्क फोर्स लखनऊ ( उ. प्र. ) यांनी शोध मोहीम राबवुन फरार आरोपी राहुल ऊर्फ कट्टु पारधी यास चंदन तस्करीच्या गुन्हयात अटक करुन त्याचे विरुध्द वनअधिनियमान्वये दोन वेगवेगळे गुन्हे नोंद करण्यात आले.

फरार आरोपी राहुल ऊर्फ कट्टु पारधी यास भंडारा येथे घेवुन येण्याकरीता लखीमपुर (उ. प्र.) येथे स्थानिक गुन्हे शाखा भंडारा येथील सपोनि श्री. रिजवी यांचेसह दिनांक ३०/११/२०१६ रोजी पोलीस पथक रवाना करण्यात आले होते. आरोपी कट्टु ऊर्फ राहुल पारधी यास पोलीस स्टेशन दिघोरीचे गुन्हयात अटक करुन कायदेशिर कार्यवाही करणेकामी श्री. सुरजुसे, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट लाखांदुर यांचे कडुन आरोपीस ताब्यात घेणेकामी दिनांक ०३/१२/२०१६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत कोलवाडकर यांनी प्रोडयुस वारंट प्राप्त करवुन घेवुन तो प्रोडयुस वारंट विशेष कर्मचाऱ्यामार्फत लखीमपुर येथे सपोनि रिजवी यांचे कडे पाठविण्यात आला होता.

फरार आरोपी कट्टु ऊर्फ राहुल पारधी यास लखीमपुर पोलीसांनी अटक केल्यानंतर त्याने आजारपणाचे ढोंग करणे सुरु केल्यावरुन त्यास उपचाराकरीता रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यास लखनऊ येथील किंग जॉर्ज मेडीकल युनिवर्सीटी लखनऊ येथे त्याच्या वैद्यकीय तपासणी करण्याकरीता अति दक्षता विभागात भर्ती केले होते त्यामुळे आरोपी कट्टु पारधी याला भंडारा पोलीसांचे ताब्यात मिळण्यास विलंब झाला होता. सपोनि श्री. रिजवी यांचे नेतृत्वात भंडारा पोलीस दिनांक ३०/११/२०१६ पासुन लखीमपुर येथे आरोपी मिळण्याकरीता तळ ठोकुन होती. आरोपी हा भंडारा पोलीसांचे ताब्यात जावु नये म्हणुन विविध क्ल्युप्त्या वापरुन अटक टाळायचा प्रयत्न करीत होता परंतु भंडारा पोलीस दलाने हार न मानता सतत १७ दिवस तळ ठोकुन त्यास शेवटी ताब्यात घेतले.

पाठविण्यात आलेले पथक आज दिनांक १७/१२/२०१६ रोजी आरोपी राहुल ऊर्फ कट्टु पारधी यास लखीमपुर (उ. प्र.) येथुन भंडारा येथे आणण्यात आले आहे.

आरोपी कट्टु ऊर्फ राहुल पारधी यास अटक करण्याकरीता **Wild Life Protection Society of India, Save Eco System And Tiger** आणि **Wild Life Crime Control** या वन्यजीव सेवाभावी संस्थां, स्पेशल टास्क फोर्स लखनऊ ( उ. प्र.) हे सर्व प्रयत्नशिल होते. व भंडारा पोलीसांच्या सहकार्याने स्पेशल टास्क फोर्स लखनऊ यांनी त्यास अटक केलेली आहे. परंतु **Wild Life Protection Society of India, Save Eco System And Tiger** आणि **Wild Life Crime Control** यांची आरोपी अटक करण्यास मोलाची मदत झालेली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विनीता साहू, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत कोलवाडकर, सपोनि श्री. रिजवी, पोना रोशन गजभिये, पोशि वैभव चामट, कौशिक गजभिये, चेतन पोटे, अनुप वालदे स्थानिक गुन्हे शाखा भंडारा चालक सफौ अनिल थोटे, पोशि किरण नागदेवे, काटे क्युआरटी पथक नियंत्रण कक्ष भंडारा यांनी केलेली आहे.




पोलीस अधीक्षक
भंडारा करीता